## नियुक्त अधिकारी, प्रारूप विकास योजना तथा सहायक संचालक, नगर रचना, पुणे यांजकडून

*महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २६ (१) अन्वये पुणे (वाढीव हद्द-०९ गावे) प्रारूप विकास योजनेचे प्रसिद्धीकरण*

### अधिसूचना

क्रमांक प्रा.वि.यो.पुणे मनपा वाढीव हद्द-०९ गावे/कलम २६*(१)*/ससंपु/१२८३/२०२५.— ज्याअर्थी, पुणे महानगरपालिकेने (यापुढे "उक्त नियोजन प्राधिकरण" असा उल्लेख करण्यात आला आहे) त्यांचे अधिपत्याखालील दिनांक ४ ऑगस्ट २०१७ रोजीच्या शासन निर्णयानुसार नव्याने समाविष्ट क्षेत्राची म्हणजेच (१) मौजे लोहगाव (उर्वरित), (२) मौजे मुंढवा (उर्वरित केशवनगर), (३) मौजे हडपसर (संपूर्ण साडेसतरानळी), (४) मौजे शिवणे (संपूर्ण उत्तमनगर), (५) मौजे शिवणे (उर्वरित), (६) मौजे आंबेगाव खुर्द (उर्वरित), (७) मौजे ऊंड्री (उर्वरित), (८) मौजे धायरी (उर्वरित), (९) मौजे आंबेगाव बु. (उर्वरित), (१०) मौजे फुरसुंगी संपूर्ण, (११) मौजे उरूळी देवाची संपूर्ण, तालुका हवेली, जिल्हा पुणे (यात यापुढे "उक्त क्षेत्र" असा उल्लेख करण्यात आला आहे) विकास योजना तयार करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे (यात यापुढे "उक्त अधिनियम" असा उल्लेख करण्यात आला आहे) कलम २३ *(१)* मधील तरतुदीनुसार प्रारूप विकास योजना (यात यापुढे "उक्त प्रारूप विकास योजना" असा उल्लेख करण्यात आला आहे) तयार करण्याचा इरादा ठराव क्र. १६०, दिनांक २८ जून २०१८ अन्वये जाहीर करून त्याबाबतची सूचना महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग एक-पुणे विभागीय पुरवणी, ऑक्टोबर ४-१०, २०१८ रोजी प्रसिद्ध केलेली आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम २४ च्या तरतुदीस अनुसरून आयुक्त, पुणे महानगरपालिका यांनी उक्त क्षेत्रासाठी उक्त प्रारूप विकास योजना तयार करण्यासाठी महानगरपालिकेचे तत्कालीन अधीक्षक अभियंता, बांधकाम विकास विभाग यांची "नगर रचना अधिकारी" म्हणून आदेश क्र. ५९९, दिनांक ११ डिसेंबर २०१८ व आदेश क्र. ४५, दिनांक २८ एप्रिल २०२३ अन्वये नियुक्ती केली आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम २६ *(१)* अन्वये उक्त प्रारूप विकास योजना विहित मुदतीत म्हणजेच देय मुदतवाढीसह दिनांक २ मार्च २०२४ पर्यंत प्रसिद्ध करण्यास उक्त नियोजन प्राधिकरण असमर्थ ठरले आहे ;

आणि ज्याअर्थी, सहसंचालक, नगर रचना, पुणे विभाग, पुणे यांनी त्यांचेकडील आदेश क्र. वि.यो.म.न.पा./कलम २१ *(४अ)*/सहसंपुवि/१४३०, दिनांक २३ ऑगस्ट २०२४ अन्वये नियोजन प्राधिकरणाचे अधिकारांचे वापर करून विकास योजनासंदर्भाने कलम २६, २८ व ३० नुसार आवश्यक वैधानिक कार्यवाही पूर्ण करणेसाठी व अनुषंगिक कर्तव्ये पार पाडणेसाठी उक्त अधिनियमाच्या कलम २१ *(४-अ)* अन्वये अभिजित केतकर, सहायक संचालक, नगर रचना, पुणे शाखा, पुणे यांची अधिकारी म्हणून नियुक्ती केली आहे (यात यापुढे "उक्त नियुक्त अधिकारी" असा उल्लेख करण्यात आला आहे) ;

आणि ज्याअर्थी, शासनाने अधिसूचना क्र. पीएमसी/प्र.क्र.४६८/नवि-२२, दिनांक ११ सप्टेंबर २०२४ रोजीच्या अधिसूचनेद्वारे उक्त क्षेत्रापैकी मौजे फुरसुंगी व मौज उरूळी देवाची गावांमधील उक्त अधिसूचनेमधील नमूद कचरा डेपोअंतर्गत असलेले क्षेत्र वगळून उर्वरित क्षेत्रासाठी नव्याने नगरपरिषद गठित केलेली आहे व त्यामुळे उक्त गावे सदर क्षेत्रातून वगळण्यात आलेली आहेत ;

आणि ज्याअर्थी, उक्त प्रारूप विकास योजना उक्त अधिनियमाच्या कलम २६ अन्वये प्रसिद्ध करण्यासाठी संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी पत्र क्र. ५३२४, दिनांक २४ ऑक्टोबर २०२४ अन्वये मुदत निश्चित करून दिलेली आहे व उक्त नियुक्त अधिकारी यांचे विनंतीनुसार आदेश क्र. प्रा.वि.यो.पुणे/वाढीव हद्द-०९ गावे/कलम २६*(१)*/मुदतवाढ/टीपीव्ही-१/५३५५, दिनांक १० सप्टेंबर २०२५ अन्वये दिनांक १६ नोव्हेंबर २०२५ पर्यंत मुदतवाढ दिली आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त नियुक्त अधिकारी यांनी उक्त प्रारूप विकास योजना तयार केली असून नियोजन प्राधिकरण या नात्याने उक्त प्रारूप विकास योजना उक्त अधिनियमाचे कलम २६ *(१)* नुसार प्रसिद्ध करण्यासाठी दिनांक १३ ऑक्टोबर २०२५ रोजी मंजुरी दिलेली आहे.

त्याअर्थी, पुणे महानगरपालिका (वाढीव हद्द-९ गावे) क्षेत्राची उक्त प्रारूप विकास योजना उक्त अधिनियमाचे कलम २६ *(१)* अन्वये नियुक्त अधिकारी या नात्याने मी, निम्न स्वाक्षरीकार नागरिकांकडून सूचना व हरकती मागविण्यासाठी प्रसिद्ध करत आहे. सदरहू सूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ६० दिवसांच्या कालावधीत जनतेकडून सूचना व हरकती मागविण्यात येत आहेत. सदरहू योजनेसंबंधीचे नकाशे व अहवाल कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत नागरिकांच्या अवलोकनार्थ खाली नमूद केलेल्या कार्यालयात उपलब्ध करून देण्यात येत आहेत :--

१) सहायक संचालक, नगर रचना, पुणे शाखा, पुणे, नवीन प्रशासकीय इमारत, बी विंग, तिसरा मजला, विधान भवनासमोर, पुणे- ४११ ००१.

२) पुणे महानगरपालिका, पुणे-४११ ००५ (बांधकाम विकास विभाग, पहिला मजला).

तसेच उक्त प्रारूप विकास योजनेचे नकाशे हे पुणे महानगरपालिकेच्या www.pmc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेले आहे. उक्त प्रारूप विकास योजनेचे नकाशे व तपशीलाच्या प्रती विहित शुल्क आकारून नागरिकांना पुणे महानगरपालिकेच्या वरील नमूद कार्यालयात उपलब्ध होऊ शकतील.

उक्त प्रारूप विकास योजनेसंबंधी नागरिकांच्या काही सूचना / हरकती असतील तर त्यांनी ही सूचना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रसिद्ध झालेल्या दिनांकापासून ६० दिवसांच्या आत नियुक्त अधिकारी तथा सहायक संचालक, नगर रचना, पुणे शाखा, पुणे, नवीन प्रशासकीय इमारत, बी विंग, तिसरा मजला, विधान भवनसमोर, पुणे-४११ ००१ यांचे कार्यालयाकडे लेखी स्वरूपात कारणांसह पाठवाव्यात. सदरची सूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ६० दिवसांच्या आत नियुक्त अधिकारी यांचेकडे प्राप्त झालेल्या सूचना / हरकतीच केवळ विचारात घेण्यात येतील.

**अभिजित केतकर,**

नियुक्त अधिकारी,
प्रारूप विकास योजना,
पुणे महानगरपालिका (वाढीव हद्द--०९ गावे) तथा
सहायक संचालक, नगर रचना, पुणे शाखा, पुणे.

पुणे, १६ ऑक्टोबर २०२५.

---

## BY APPOINTED OFFICER, DRAFT DEVELOPMENT PLAN AND ASSISTANT DIRECTOR, TOWN PLANNING, PUNE

*Publication of Draft Development Plan Pune (Extended limit 9 villages) under Section 26* (1) *of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966*

## NOTIFICATION

क्रमांक प्रा.वि.यो.पुणे मनपा वाढीव हद्द-०९ गावे/कलम २६*(१)*/ससंपु/१२८३/२०२५.—Whereas, Pune Municipal Corporation (hereinafter referred to as the “said Planning authority”), *vide* Resolution No. 160, dated 28th June 2018, declared its intention to prepare the Draft Development Plan (hereinafter referred to as “the said Draft Development Plan”) for the newly incorporated areas within its jurisdiction as per the Government Resolution, dated 4th October 2017, Namely (1) Mouje Lohgaon (remaining), (2) Mouje Mundhwa (remaining - Keshavnagar), (3) Mouje Hadapsar (entire Sadesatranali), (4) Mouje Shivne (entire Uttamnagar), (5) Mouje Shivne (remaining), (6) Mouje Ambegaon Khurd (remaining), (7) Mouje Undri (remaining), (8) Mouje Dhayari (remaining), (9) Mouje Ambegaon Budruk (remaining), (10) Mouje Fursungi (entire), (11) Mouje Uruli Devachi (entire) all in Taluka Haveli, District Pune (hereinafter collectively referred to as “the said Area”) as per the provisions of Section 23 *(1)* of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as “the said Act”) and such notice was published in the Maharashtra Government Gazette, Part One-Pune Divisional Supplement, October 4 - 10, 2018 ;

and whereas, Municipal Commissioner, Pune Municipal Corporation, has appointed the then Superintending Engineer, Building Development Department as “Town Planning Officer” for preparing the said Draft Development Plan, *vide* Order No. 599, dated 11th December 2018 and Order No. 45, dated 28th April 2023 as per the provisions of Section 24 of the said Act ;

and whereas, the said planning authority failed to publish the said Draft Development Plan under Section 26 *(1)* of the said Act, within the prescribed time limit, including the approved extensions thereof, *i.e.* up to dated 2nd March 2024 ;

and whereas, the Joint Director of Town Planning, Pune Division, Pune, has appointed Abhijit Ketkar, Assistant Director, Town Planning, Pune Branch (hereinafter referred to as “the said Appointed Officer”) *vide* Order No. Viyomanapa/kalam 21(4a)/sahasampuvi/1430, dated 23rd August 2024, under Section 21 *(4A)* of the said Act, to exercise the powers and perform the duties of the planning authority and to undertake all statutory actions required under Sections 26, 28, and 30 of the said Act for the preparation, publication and submission of the said Draft Development Plan to Government ;

and whereas, the Government, *vide* Notification No. PMC/Pr.Kr.468/Navi-22, dated 11th September 2024, has constituted a new Municipal Council out of the two villages namely Fursungi and Uruli-Devachi excluding the land area falling under the “Garbage Depot” within these two villages as specified in the said Notification, Therefore the area is removed from the said Area ;

and whereas, the Director, Town Planning, Maharashtra State, Pune, *vide* Letter No. 5324, dated

24th October 2024, has prescribed a time limit for publishing the said Draft Development Plan under Section 26 *(1)* of the said Act. Subsequently, upon request from the said Appointed Officer, granted extension up to dated 16th November 2025, *vide* Order No. Pr.V.Yo.Pune/Extended Limits–09 Villages/ Sec.26(1)/Extension/TPV-1/5355, dated 10th September 2025 ;

and whereas, the said Appointed Officer has now prepared the said Draft Development Plan, in his capacity as the Planning Authority, has approved it for publication under Section 26 *(1)* of the said Act on dated 13th October 2025.

Therefore, in exercise of the powers conferred under Section 26 *(1)* of the said Act, I, the undersigned, in my capacity as the Appointed Officer, hereby publish the said Draft Development Plan inviting suggestions and objections from the public. Suggestions and objections from the public are hereby invited within a period of 60 days from the date of publication of this notice in the Maharashtra Government Gazette. The maps and report pertaining to the said Draft Development Plan shall be available for inspection by the public during office hours on all working days at the offices mentioned below :–

1. The Assistant Director, Town Planning, Pune Branch, Pune, New Administrative Building, B Wing, 3rd Floor, Opposite Vidhan Bhavan, Pune-411 001.

2. Pune Municipal Corporation, Shivajinagar, Pune- 411 005 (Building Development Department, 1st Floor).

Further, the maps of the said Draft Development Plan are also made available on the official website of the Pune Municipal Corporation : **www.pmc.gov.in** Copies of the plan and related documents can be obtained upon payment of prescribed fees at the above mentioned office of Pune Municipal Corporation.

Suggestions / objections, if any, from the public on Draft Development Plan, along with reasons in writing, may be submitted to the Appointed Officer and Assistant Director, Town Planning, Pune Branch, Pune, New Administrative Building, B Wing, 3rd Floor, Opposite Vidhan Bhavan, Pune-411 001, within 60 days from the date of publication of this notice in the Maharashtra Government Gazette. Suggestions and objections received only within 60 days from the date of publication will be considered.

**ABHIJIT KETKAR,**

Appointed Officer, Draft Development Plan for
Pune Municipal Corporation (Extended Limit-09 Villages)
and Assistant Director, Town Planning,
Pune Branch, Pune.

Pune, 16th October 2025.

---

**जिल्हाधिकारी यांजकडून**

**जिल्हा पुणे**

*भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (महाराष्ट्र सुधारणा अधिनियम, २०१८) अन्वये कलम ११ (१) खालील*

**अधिसूचना**

क्रमांक पीएलए/कावि-१५१३/भूसं./एसआर/०१/२०२५.— ज्याअर्थी, भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) याच्या कलम ३ च्या खंड *(इ)* च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग क्रमांक संकीर्ण-११/२०१४/प्र.क्र.७७/अ-२, दिनांक १९ जानेवारी २०१५ (यात यापुढे जिचा निर्देश "उक्त अधिसूचना" असा करण्यात आला आहे) याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड *(झेड ओ)* मध्ये व्याख्या केलेल्या एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी, एखाद्या जिल्ह्यातील १०,००० हेक्टरपेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरिता जमीन संपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्ह्याचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल ;